ePaper

**भयानक त्सुनामी येणार, संकटाची चाहूल; जपानच्या भूकंपानंतर चिंता वाढली!**




| वर्ष - 9 | अंक -105 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 9 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत

- राष्ट्रीय कराटे अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात
- अभिषेकसोबत सलामीला कोण?
- '५०० कोटी देणारा सीएम बनतो'
- वंदे मातरमवर संसदेमध्ये चर्चा

वयाच्या ९६ व्या वर्षी | ज्येष्ठ कामगार नेते बाबा आढाव यांचे पुण्यात निधन

# कष्टकऱ्यांचा आधारवड कोसळला!

## असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्य वेचणाऱ्या ज्येष्ठ सामाजिक योद्ध्याला अखेरचा सलाम



| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांचं निधन झालं आहे. बाबा आढव हे कष्टकरी आणि श्रमिकांचे नेते म्हणून ओळखले जाणारे नेते होते. बाबा आढाव गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. पण उपचारादरम्यान त्यांची आज प्राणज्योत मालवली. बाबा आढाव यांचं आज रात्री 8.25 वाजता निधन झालं. त्यांच्या निधनमुळे असंघटित कामगारांचा आवाज बुलंद करून त्यांच्या न्याय हक्कांसाठी लढणारा नेता हरपला अशी भावना सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहे.**

बाबा आढाव खऱ्या अर्थाने संघर्ष करणारे नेते होते. त्यांनी गेल्यावर्षी ईव्हीएमच्या विरोधात आत्मक्लेश आंदोलन केलं होतं. वयाच्या 95 व्या वर्षी त्यांनी सलग तीन दिवस ईव्हीएमच्या विरोधात आत्मक्लेश आंदोलन केलं होतं. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अनेकांनी ईव्हीएमवर टीका केली होती. त्यानंतर बाबा आढाव यांनी महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत महात्मा फुले वाडा येथे आत्मक्लेश उपोषण सुरु केलं होतं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पाणी पिवून त्यांनी आपलं उपोषण सोडलं होतं. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जयंत पाटील, संजय राऊत या नेत्यांनी त्यांची भेट घेतली होती.

बाबा आढाव यांचे आज सायंकाळी 8 वाजून 25 मिनिटांनी निधन झाले आहे. त्यांनी प्रकृती खालावल्यानंतर त्यांच्यावर पुण्यातील पुना हॉस्पिटल येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू सुरु होते. बाबा आढाव हे 89 वर्षांचे होते. असंघटित कष्टकऱ्यांचे नेते म्हणून बाबा आढाव यांची ओळख देशात होती. फेरीवाले, कचरावेचक आणि हमाल या असंघटित कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी हमाल पंचायत नावाची संघटना स्थापन केली आणि त्यातूनच गेली अनेक वर्ष बाबा आढाव हे सामाजिक जीवनात कार्यरत होते.

डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे गेल्या 12 दिवसांपूर्वी त्यांना तात्काळ हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले होते. सध्या त्यांच्यावर हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य व तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार चालू होते. आज 8 वाजून 25 मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मावळली. बाबा आढाव यांचा जन्म १९३० मध्ये पुण्यात झाला. ते नाना पेठेतील नामांकित आयुर्वेदिक डॉक्टर होते. याच नाना पेठ भागात अनेक व्यवसायांतील कामगार त्यांच्याकडे उपचार घेण्यासाठी येत असतं त्यातूनच त्यांना हमालांना येणाऱ्या अनेक अडचणी लक्षात आल्या. हमालांचे शोषण होऊनही त्यांना कुठलेही कायदेशीर संरक्षण नसल्याचे त्यांनी पाहिले. अखेर त्यांनी १९६६ मध्ये बाबांनी डॉक्टरकीचा व्यवसाय सोडला आणि कामगारांच्या पाठीशी उभे राहायचे ठरवले. डॉ. बाबा आढाव सुरुवातीला समाजवादी पक्षाबरोबर काम करायचे. मात्र, त्यांनी तो राजकीय पक्ष सोडला आणि १९५५ मध्ये हमाल पंचायत स्थापन केली. याच पंचायतीची पुढे १९७२ मध्ये कामगार संघटना झाली. १९५६ मध्ये वाहतूक क्षेत्रातील कामगारांना योग्य वेतन मिळावे, या मागणीसाठी हमाल पंचायतीने पहिले आंदोलन केले. त्यानंतर त्यासाठी केलेल्या सततच्या संघर्षामुळे १९६९ ला राज्यात महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार कायदा मंजूर झाला. असंघटित कामगारांच्या कल्याण आणि सुरक्षेसाठी भारतातील हा पहिला कायदा होता. याच संपूर्ण श्रेय हे बाबा आढाव यांच्या संघर्षालाच जाते. १९७२ मध्ये दलितांना सर्व ठिकाणी पाणी मिळावे, यासाठी त्यांनी 'एक गाव, एक पाणवठा' नावाने राज्यभर मोर्चे काढले. पुण्यातील कामगारांना स्वस्त, पौष्टिक जेवण उपलब्ध करून देणारी 'कष्टाची भाकरी योजना' हीदेखील आढाव यांचीच कल्पना होती. या योजनेतील पहिल्या शाखेची सुरुवात २ ऑक्टोबर १९७४ रोजी भवानी पेठेत झाली.

> आपल्या महाराष्ट्रात प्रागतिक ,कृतीशील विचार मांडून ते आचरणात आणणाऱ्या शिलेदारांची एक मोठी फळी आहे. भूमिका घेताना परिणामांची, प्रस्थापित व्यवस्थेच्या रोषाची तमा न बाळगणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये ज्येष्ठ समाजसेवक, पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक डॉ. बाबा आढाव ह्यांचं नाव आवर्जून घ्यावं लागेल. आज जेव्हा त्यांच्या निधनाचं वृत्त समजलं तेव्हा त्यांचा संघर्षाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा सारा पट डोळ्यासमोरून गेला. 'एकाकी मजदूर' चळवळ, कामगारांच्या हक्कांसाठीची त्यांची अखंड झुंज, समतेवर आधारित समाजरचनेचा त्यांचा ठाम निर्धार अशा सर्व भूमिकांमधून ते सतत प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देत राहिले. आजच्या सामाजिक दृष्ट्या अस्थिर, विषमतेने, विद्वेषाने ग्रासलेल्या काळात बाबा आढाव ह्यांच्यासारख्या निडर, विचारांशी बांधिलकी ठेवून काम करणाऱ्या विभूतींची उणीव सदैव भासत राहील. बाबा आढाव ह्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व आढाव कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त करतो.
>
> **-शरद पवार,** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

> हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, कागद-काचा वेचणाऱ्यांची संघटना अशा विविध संघटनांद्वारे लाखो कष्टकऱ्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचे कार्य बाबा आढाव यांनी केले. 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ त्यांनी उभी केली. सत्यशोधक चळवळीचा विचार आपल्या कृतीतून त्यांनी आयुष्यभर जपला. समाजातील सर्वात तळातील घटकाला न्याय मिळवून देणे, हाच त्यांचा ध्यास होता. संघर्षमय जीवन जगत त्यांनी प्रत्यक्ष कामातून समाजवादाची मूर्त प्रतिमा उभी केली. त्यांचा आशावाद, परखड विचार, निस्वार्थी वृत्ती आणि जनतेशी असलेली नाळ हे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचे मोठे बळ होते. बाबा आढाव यांचे कार्य म्हणजे समाजहितासाठीचे निर्भीड आणि ज्वलंत आयुष्य कसे असावे, याचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील प्रगत, विचारशील चळवळीचे अपरिमित नुकसान झाले असून महाराष्ट्राने समाजसेवेचा महान तपस्वी गमावला आहे.
>
> **-अजित पवार,** उपमुख्यमंत्री

> ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दु:खद आहे. वंचित आणि असंघटित घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. त्यांचे आधारस्तंभ म्हणून काम केले. हमाल, रिक्षाचालक, बांधकाम मजुरांना न्याय देण्यासाठी त्यांनी संघटन उभे केले. हमाल पंचायत, एक गाव-एक पाणवठा असे अनेक उपक्रम त्यांनी राबविले. सामाजिक कुप्रथांविरोधात त्यांनी दिलेला लढा हा कायम स्मरणात राहील. महाराष्ट्राला समाजसेवकांची एक थोर परंपरा कायमच लाभली. त्या परंपरेतील एक मौलिक व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले. ते कायम स्मरणात राहतील, त्यांचे विचार येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहतील. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या आप्तस्वकियांच्या आणि चाहत्यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत", अशा शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.
>
> **-देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

आयुक्तांनी दिले कारवाईचे आदेश

१० हजार दंडासह गुन्हा दाखल होणार

# अनधिकृत फ्लेक्सवर कारवाईचे आदेश

## दंडासह गुन्हा दाखल करण्यात येणार

| पुणे |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात वाढत चाललेल्या अनधिकृत राजकीय फ्लेक्सच्या विळख्यातून पुणे महापालिकेने आता कडक भूमिका घेतली आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दोन दिवसांत तीव्र कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर प्रशासन सतर्क झाले असून, अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्यांवर आता दंडासह गुन्हा दाखल होणार आहे.**




निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांनी शहरभर उभारलेले पोस्टर, बॅनर, शुभेच्छा फ्लेक्स, कार्यक्रम जाहिराती यांमुळे शहराचे विद्रूपीकरण होत असल्याने नागरिकांकडूनही नाराजी व्यक्त केली जात होती. महापालिकेने काही दिवसांपूर्वीच राजकीय पक्षांना आणि संभाव्य उमेदवारांना अनधिकृत फ्लेक्स लावू नयेत, तसेच आधी लावलेले फ्लेक्स तातडीने हटवावेत अशी विनंती केली होती. मात्र यानंतरही प्रत्यक्षात कोणतीही सुधारणा दिसून न आल्याने अखेर आयुक्तांनी कठोर निर्णय घेत कारवाईचे आदेश दिले. आयुक्तांनी स्पष्ट केले की, कोणत्याही प्रकारचा अनधिकृत फ्लेक्स, बॅनर किंवा होर्डिंग शहरात सहन केले जाणार नाही. राजकीय असो वा गैर-राजकीय, परवानगीशिवाय लावलेला कोणताही फ्लेक्स तत्काळ हटवला जाईल आणि संबंधित व्यक्तिविरुद्ध १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल. याचबरोबर, अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्यांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे निवडणूक काळातील अवैध जाहिरातींवर मोठ्या प्रमाणात आळा बसेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. महापालिकेच्या आकाश चिन्ह विभागाच्या पथकांना, क्षेत्रीय कार्यालयांना आणि संबंधित विभागांना ४८ तासांत मोहीम राबवण्याचे आदेश देण्यात आले असून, शहरातील प्रमुख चौक, रस्ते, उड्डाणपूल, सार्वजनिक इमारती आणि खासगी जागांवरील अनधिकृत फ्लेक्स हटवण्याचे काम तातडीने सुरू होणार आहे.दरम्यान, काही प्रभागांमध्ये मध्यरात्रीपासूनच अनधिकृत फ्लेक्स काढण्याचे काम सुरू करण्यात आल्याचे समजते. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात शुभेच्छा फ्लेक्स, जन्मदिवस पोस्टर्स आणि राजकीय बॅनर लावलेले आढळून आले. निवडणुकीचे वातावरण तापत असताना उमेदवारांकडून स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी अशा प्रकारच्या जाहिरातींना उधाण येते. मात्र या गर्दीमुळे शहराचे सौंदर्य

## दोन दिवसांत तीव्र कारवाई

> उमेदवारांना अनधिकृत फ्लेक्स लावू नयेत, तसेच आधी लावलेले फ्लेक्स तातडीने हटवावेत अशी विनंती केली होती. मात्र यानंतरही प्रत्यक्षात कोणतीही सुधारणा दिसून न आल्याने अखेर आयुक्तांनी कठोर निर्णय घेत कारवाईचे आदेश दिले. आयुक्तांनी स्पष्ट केले की, कोणत्याही प्रकारचा अनधिकृत फ्लेक्स, बॅनर किंवा होर्डिंग शहरात सहन केले जाणार नाही. राजकीय असो वा गैर-राजकीय, परवानगीशिवाय लावलेला कोणताही फ्लेक्स तत्काळ हटवला जाईल.

बिघडत असून, वाहतुकीतही अडथळे निर्माण होत असल्याचा अनुभव नागरिकाला दररोज येत आहे.महापालिका प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जर राजकीय फ्लेक्स लावणारे स्वतःहून फ्लेक्स हटवतील तर दंडाची कारवाई टाळता येऊ शकते. पण फ्लेक्स जागेवर आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात कोणतीही सुट दिली जाणार नाही. काही पक्ष नेत्यांनी मात्र प्रशासनाच्या अचानक वाढलेल्या कारवाईवर नाराजी व्यक्त केली असून, निवडणूक प्रचाराच्या तयारीला अडथळा आणल्याचा आरोप केला आहे. मात्र शहरातील शिस्त आणि सौंदर्य जपण्यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे. निवडणुकीच्या दिशेने शहराची पावले वेगाने चालली असतानाच महापालिकेची ही अचानक कडक कारवाई राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. पुढील दोन दिवसांत शहरातील मोठा भाग अनधिकृत फ्लेक्सपासून मुक्त होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे.शहरात वाढत चाललेल्या अनधिकृत राजकीय फ्लेक्सच्या विळख्यातून पुणे महापालिकेने आता कडक भूमिका घेतली आहे. दिल्यानंतर प्रशासन सतर्क झाले असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांनी शहरभर उभारलेले पोस्टर, बॅनर, शुभेच्छा फ्लेक्स, कार्यक्रम जाहिराती यांमुळे शहराचे विद्रूपीकरण होत असल्याने नागरिकांकडूनही नाराजी व्यक्त केली जात होती.

---

# शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक

## जितेंद्र डुडी यांनी प्रकल्पग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांसोबत केली चर्चा

| पुणे |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ (PURANDAR AIRPORT) प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकरी व ग्रामस्थांच्या जमिनीचा दर, मोबदला व विविध मागण्यांबाबत आज जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रकल्पग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांसोबत चर्चा केली.**



प्रकल्पबाधितांच्या मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच प्रतिनिधीमंडळासोबत बैठक घेऊन पुढील निर्णयांवर चर्चा करणार असल्याची माहिती डुडी यांनी दिली.जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी देय जमीनदर व मोबदला निश्चिती संदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील तसेच प्रकल्पबाधित शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यात जमिनीचा दर व मोबदला, घरांसाठी जागा, मोबदल्यावर आयकरातून सुट, पुनर्वसनासाठी मुद्रांक शुल्कात सवलत, प्रकल्पग्रस्त व भूमिहीन

## सर्व दक्षता घेतली जाईल

> सुमारे तीन हजार एकर क्षेत्राचे भूसंपादन करण्यात येणार आहे. या प्रक्रियेस शेतकऱ्यांनी वेळोवेळी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे डुडी यांनी सांगितले. संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने राबविण्यात येईल, कोणावरही अन्याय होणार नाही, तसेच सर्व प्रकल्पग्रस्त नागरिकांना भूसंपादन, पीक सर्वेक्षण याबाबतची माहिती नियमितपणे दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.शेतकरी व ग्रामस्थांना कौशल्यविषयक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल. एकही प्रकल्पबाधित वंचित राहू नये यासाठी प्रशासन कटिबद्ध असून आवश्यक ती सर्व दक्षता घेतली जाईल.

प्रमाणपत्र, कुणबी प्रमाणपत्र, वाढीव एफएसआय, पीएमआरडीए मार्फत भुखंड विकासाचे नियोजन, परिसरातील पायाभूत सुविधांचा आराखडा, विमानतळ परिसरातील विकसित भागांना महापुरुषांची नावे देण्याचा प्रस्ताव, शेती पिकांचे मूल्यांकन, भुमिपुत्रांना विमानतळात कायमस्वरूपी नोकरीची संधी, भुखंडात आरक्षण, हक्काची घरे, व्यवसाय व रोजगारासाठी कर्ज व्याज दरात सवलत, शैक्षणिक शुल्कात सवलत आदी मागण्यांचा समावेश होता.

थोर समाजसुधारक संत जगनाडे महाराज यांना अभिवादन

महापालिका निवडणुकीत

# 100 टक्के मतदान करण्याचा निर्धार!

## पिंपरी चिंचवड महापालिकेत मतदानाची शपथ!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: थोर समाजसुधारक संत जगनाडे महाराज यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महापालिका निवडणुकीत १०० % टक्के मतदान करण्याचा निर्धारही व्यक्त केला.**



महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सह शहर अभियंता अनिल भालसाखळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, माजी नगरसदस्य बन्सी पारडे, पुणे महसूल विभागाच्या राज्य समन्वय समितीचे सदस्य ॲड. विशाल डोंगरे,सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश अंबिके, अनिल राऊत, विनीत राऊत, संजय जगनाडे,सुनील डोंगरे, प्रदीप सायकर,दिलीप चौधरी, संतोष साखरे, प्रथमेश अंबेरकर, अभिजित भोसले, राहुल खानविलकर, सोनाली खानविलकर, प्रवीण खानविलकर, प्रणाली खानविलकर, विजय अंबेरकर, विनिता अंबेरकर, रवींद्र हरसुलकर, विनीत राऊत, विजय महाडिक, रोहित राऊत,राजाराम वंजारे,तसेच महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी “आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू”, अशी मतदानाची शपथ घेतली आणि येत्या महापालिका निवडणुकीत १०० % टक्के मतदान करण्याचा निर्धारही व्यक्त केला,प्रफुल्ल पुराणिक यांनी मतदान शपथेचे वाचन केले.

# हिंजवडीतील तीन रस्त्यांची मोजणी पूर्ण

## वाहतूक कोंडी ; जागा मालक, शेतकऱ्यांना मोबदला दिला जाणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हिंजवडी परिसरातील तीन रस्त्यांची मोजणी ‘पीएमआरडीए’कडून पूर्ण करण्यात आली आहे. यानंतर कागदपत्रांची पूर्तता करत संबंधित जागा मालक, शेतकऱ्यांना मोबदला दिला जाणार आहे. ही प्रक्रिया होताच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. आहे.**



या भागात तब्बल १८ रस्त्यांचे प्रस्ताव आहेत. काही रस्त्यांची मोजणी सुरू आहे. दरम्यान, या मोजणीदरम्यान स्थानिक नागरिकांनी काहीसा विरोध दर्शवला होता. त्यामुळे मोजणी करण्यास अडथळे आले. अखेर स्थानिक पोलिस, प्रांतधिकारी यांनी तेथे धाव घेतली. त्यानंतर काहीसा तणाव निवळला. यानंतर मोजणी पूर्ण झाली.

हिंजवडी परिसरात सूर्या हॉस्पिटल ते ठाकर वस्ती, सूर्या हॉस्पिटल ते साखरे वस्ती, नांदे ते माण रस्ता, ठाकरवस्ती ते माण गावठाण, म्हाळुंगे ते हिंजवडी फेज १, मारुंजी ते शनिमंदिर वाकड, ठाकर वस्ती ते माण गावठाण, मेझा ९ हॉटेल ते लक्ष्मी चौक, जगताप चौक ते कासारसाई, भुगाव बायपास ते भुगाव, लक्ष्मी चौक ते मारुंजी कोलते पाटील, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हिंजवडी गावठाण, हिंजवडी फेज ३ ते माण गाव, पांडवनगर, कॅपजेमिनी ते कासारसाई रस्ता यांसह अंतर्गत तीन अशा १८ रस्त्यांच्या रुंदीकरणाचे या भागात नियोजन आहे.

### दोन आठवड्यांपासून प्रक्रिया

अरुंद रस्ते, अपघात, वाहतूक कोंडी आणि नागरी समस्यांमुळे हिंजवडी परिसरातील नागरिक, आयटीयन्स वैतागले आहेत. त्यामुळे या रस्त्यांची आखणी करण्यात आली आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून रस्त्यांची मोजणी केली जात आहे. त्यापैकी सूर्या हॉस्पिटल ते ठकारवस्ती, लक्ष्मी चौक मारुंजी ते कोलते पाटील आणि पद्मभूषण चौक ते जगताप चौक या रस्त्यांची मोजणी पूर्ण झाली आहे.




# चिंताजनक उपासमार

**मेळघाटमध्ये जून ते ऑगस्ट या कालावधीत शून्य ते सहा वर्षांच्या ६५ मुलांचा कुपोषणामुळे मत्यू झाल्याच्या माहितीची दखल घेत ही स्थिती धक्कादायक असल्याची टिप्पणी नोंदवत राज्य सरकारचा दृष्टिकोन अत्यंत बेजबाबदार असल्याचे . या बालकांचे मृत्यू न्यूमोनियामुळे झाले असल्याचा दावा सरकारी वकिलांनी केल्यानंतर न्यायालयाने न्यूमोनिया का झाला, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला.**



नवी संस्कृतीच्या इतिहासात उपासमार ही सर्वांत माभयावह समस्या राहिली आहे. विज्ञान, कृषी उत्पादन, शासन व्यवस्था आणि सामाजिक सुरक्षेच्या असंख्य योजनांत प्रगती झाली असली, तरी या सर्व प्रगतीच्या दरम्यान एखाद्या प्रदेशात कुपोषणामुळे लहान मुलांचा मृत्यू होत असल्याची बातमी येणे ही आपल्यासाठी केवळ धक्कादायक नव्हे, तर प्रशासनाच्या संवेदनशून्यतेचे अत्यंत वेदनादायी चित्र आहे. महाराष्ट्रात मेळघाटसारख्या दुर्गम आदिवासी भागातील कुपोषणाचा प्रश्न हा वर्षानुवर्षांपासून विकासाबाबतच्या दाव्यांपुढे प्रश्नचिन्ह उपस्थित करत राहिला आहे. हा प्रश्न केवळ प्रशासनाच्या अपयशाचे किंवा योजनांच्या अयोग्य अंमलबजावणीचे परिणाम म्हणून पाहणे अपुरे ठरेल. हा प्रश्न विकासाच्या संकल्पनांशी आणि समता व न्यायाच्या तात्त्विक मूल्यांशी जोडलेला आहे. मेळघाटमध्ये मागील सहा महिन्यांत ६५ बालकांचे मृत्यू झाल्याची ताजी आकडेवारी हा प्रश्न सोडवण्यासाठी वर्षानुवर्षांपासून सुरू असलेल्या योजना कुचकामी ठरल्याचे दर्शवणारी आहे. शासनाच्या कागदोपत्री योजनांचा आणि प्रत्यक्षात दिसणाऱ्या सामाजिक वास्तवातील दरी किती खोल आहे, हे यातून स्पष्ट होत आहे.याची खरी जाणीव आपल्याला नसते. कुपोषण म्हणजे केवळ उपासमार नव्हे. त्याचा बालकांच्या शारीरिक वाढीवर, बुद्धिमत्तेवर, मातांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असतो. त्यामुळे कुपोषण संपूर्ण समाजाच्या प्रगतीला रोखणारी समस्या आहे. राज्यात विविध कल्याणकारी योजना सुरू आहेत. बालकांसाठी अन्नपूरक योजना, माता-बाल आरोग्य कार्यक्रम, मोफत धान्य योजना, अंगणवाडी सेवा, शालेय पोषण आहार यांसारख्या अनेक योजनांवर राज्य सरकार, केंद्र सरकार कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. असे असूनही यंदाच्या वर्षी जूनपासून तब्बल ६५ बालकांचे मृत्यू कुपोषणामुळे झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, राज्य सरकारच्या संबंधित विभागांनी या मुलांच्या कुटुंबांची फारशी दखल घेतली नाही. अखेरीस मुंबई उच्च न्यायालयाने यासंदर्भातील याचिकांवर सुनावणी करताना राज्य सरकारला फटकारले आहे. ही स्थिती धक्कादायक असल्याची टिप्पणी करत राज्य सरकारचा दृष्टिकोन अत्यंत बेजबाबदार असल्याचे ताशेरेही उच्च न्यायालयाने ओढले आहेत, या बालकांचे मृत्यू न्यूमोनियामुळे झाले असल्याचा दावा सरकारी वकिलांनी केल्यानंतर न्यायालयाने न्यूमोनिया का झाला, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला आहे. सरकारने सादर केलेली कागदपत्रे आणि दाव्यांवर विश्वास ठेवणे कठीण आहे, कारण, कागदोपत्री सर्व काही सुरळीत दिसते; परंतु वास्तव त्यापासून खूप दूर आहे. अभ्यासकांच्या मते, आदिवासी भागांसाठीच्या विकासाची संकल्पना आपल्याकडे अजूनही सर्वसमावेशक नाही. आदिवासी भागांच्या गरजा या केवळ पायाभूत सुविधांपुरत्या मर्यादित नसतात. त्यांच्या आरोग्याच्या प्रश्नांना विशेष स्वरूप असते. गर्भवतींच्या पोषणाच्या गरजा, प्रसूतीसाठी सुरक्षित व्यवस्था, प्रसूतीनंतरची काळजी, बालकांसाठी विशेष अन्नपूरक पदार्थांची उपलब्धता या सर्व गोष्टी नसतील, तर कुपोषण हे अपरिहार्यपणे वाढणारच. मेळघाटमध्ये या मूलभूत गोष्टींचा अभाव अनेक वर्षांपासून जाणवत आला आहे. दरवेळी सरकार या भागासाठी भरीव निधी दिल्याचे, सुधारणा केल्याचे जाहीर करते; पण तरीही परिस्थिती का बदलत नाही, हा मूलभूत प्रश्न कायम राहतो. फक्त धान्य मिळाले म्हणजे पोषण मिळाले असे होत नाही. पोषण म्हणजे प्रथिने, जीवनसत्त्वे, सूक्ष्म पोषक तत्वे आणि संतुलित आहार या सर्वांचे संयोजन. आदिवासी भागातील कुटुंबांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने त्या कुटुंबांपर्यंतविविधता असलेला आहार पोहोचत नाही. मोफत धान्याने पोट भरते; पण शरीराची वाढ आणि आरोग्य कायम ठेवण्यासाठीआपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत पोहोचवण्यासाठी आवश्यक सुविधा नसणे यामुळे परिस्थिती अधिक बिकट बनते.

## प्रासंगिक »

# सर्वार्थ समाधानी

***शत्रूचा शत्रू तो आपला मित्र असे मार्गदर्शक तत्त्व एकेकाळी विशेषत: परराष्ट्र संबंधांबाबत सांगितले जात असे.***

भारत दौऱ्यात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या कोडकौतुकात आपण कोणतीही कसूर ठेवली नाही, हे उत्तम झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे माथेफिरू प्रेमवीराप्रमाणे वागत असताना त्यांना आपल्याकडून 'तू नही और सही' असा संदेश दिला जाणे गरजेचे होते. तो पुतिन यांच्या भारत दौऱ्यात भरभरून देता आला. त्याची गरज ट्रम्प यांनीच निर्माण केली. ट्रम्प यांच्या हास्यास्पद धोरण- असातत्याने अमेरिका महान होईल, न होईल. पण त्यांच्या अशा वागण्याने अमेरिकेविरोधातील देशांचे संबंध अधिक दृढ होऊ लागतील; हे निश्चित. पुतिन यांच्या या दौऱ्यात त्याची प्रचीती आली. वास्तविक ट्रम्प यांच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या काळात भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध गोड मधुचंद्री होते. तेव्हा त्यामुळे पहिल्यांदाच आपण रशियापासून दूर जात असल्याचे चित्र निर्माण झाले. ते काही प्रमाणात योग्यही होते. कारण पुतिन यांचा रशिया हा सोविएत रशिया नाही.

**इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे लोकांना पोषणशास्त्र, आहार नियोजन, आणि नैसर्गिक पदार्थांबद्दल भरपूर माहिती मिळू लागली आहे. यूट्यूबवर अनेक आहारतज्ज्ञ, डॉक्टर, फिटनेस कोच लोकांना साधे, घरच्या घरी करता येणारे बदल सुचवतात. पूर्वी "डाएट" म्हणजे मोठा त्याग आणि उपासमार समजली जायची; आता ती "स्मार्ट ईटिंग" झालेली आहे.**

# नव्या अन्नक्रांतीत आपण कुठे आहोत ?

भारताचा मध्यमवर्ग दररोज लाखो स्क्रीनवरून आरोग्याशी संबंधित माहिती घेतो आहे, त्यातून प्रेरित होतो आहे, आणि त्याला आपल्या जीवनात उतरवतो आहे. म्हणूनच हेल्दी किचन ही केवळ आर्थिक क्षमता किंवा ब्रँडेड पदार्थांची गोष्ट नाही; ती घरातील संस्कृती बदलण्याची प्रक्रिया आहे.भारतीय समाजात घराच्या स्वयंपाकघराला केवळ जेवण बनवण्याचं ठिकाण समजण्याची सवय आहे. पण गेल्या काही वर्षांत ही परंपरागत दृष्टीकोनात मोठी उलथापालथ होत आहे. आजचं भारतीय किचन हे फक्त स्वयंपाकाचं घर उरलेलं नाही, तर जीवनशैली, आरोग्य, आणि विचारांची नवी जागरूकता निर्माण करणारी जागा बनत आहे. "फूड रेव्होल्यूशन" हे शब्द आधी परदेशात जरी उदयास आले असले, तरी ते आता भारतात पाय रोवताना दिसत आहे कारण येथे अन्न हा संस्कृतीचा, परिवाराचा आणि आरोग्याचा एकत्रित पाया आहे. भारतीय घरांमध्ये आज एक मोठा बदल दिसतो



आहे. पूर्वी चव, तृप्ती आणि परंपरांना प्राधान्य द्यायचं. आता त्यात आरोग्य, पोषण, टिकाव आणि स्वच्छतेची भर पडली आहे. हा बदल केवळ ट्रेंड म्हणून नाही, तर कोरोनानंतरच्या काळात निर्माण झालेल्या आरोग्यजाणीवेतून आलेला आहे. कोविडच्या अनुभवाने भारतीयांना हे शिकवलं की डॉक्टरांच्या औषधांपेक्षा घरच्या ताटातील पदार्थ शरीराला अधिक मजबूत करतात. हळद, आलं, लसूण, तुळस, आणि घरच्या भोजनातील संतुलित मसाल्यांचं महत्त्व पुन्हा नव्यानं जाणवू लागलं. त्यामुळे लोकांनी बाहेरच्या अति प्रक्रिया केलेल्या अन्नापासून अंतर ठेवत घरची स्वयंपाकघरं सुधारायला सुरुवात केली.

गेल्या काही वर्षांत भारतीय समाजात "हेल्दी खाणं" हा शब्द केवळ श्रीमंतांचा किंवा फिटनेस उद्योगाचा विषय राहिला नाही. आज लहान शहरात, गावात, आणि अगदी साध्या मध्यमवर्गीय कुटुंबातही पोषणाबद्दल बोललं जातं. डब्यात काय द्यायचं, सकाळी काय खायचं, तेल किती वापरायचं, तुपाचं काय प्रमाण असावं, या सगळ्या गोष्टी चर्चेचा विषय बनल्या आहेत. हे खरे म्हणजे फूड रेव्होल्यूशनचं मूळ आहे. जेवण केवळ पोटभरण्यासाठी नाही, तर जीवनशैली घडवण्यासाठी असतं, हे लोक समजू लागले आहेत. आता भारतीय घरात एक बदल दिसतो आहे. घरातील किचन हे महिलांचं एकट्याचं काम न राहता संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी होत आहे. पुरुष स्वयंपाक शिकत आहेत, मुलं भाजी धुण्यात मदत करतात, तरुणाई इंटरनेटवरून नवी रेसिपीज ट्राय करते. एखादा काळ होता, जेव्हा घरात "हेल्दी" म्हणजे फक्त सूप किंवा उकडलेलं काहीतरी समजलं जायचं.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## महायुतीची हुकूमशाही
## औट घटकेचे अधिवेशन, विरोधीपक्ष नेते नाहीत

# प्रश्नोत्तरे रद्द, फक्त बघत राहा!

## उदरातून महायुतीची हुकूमशाही

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**चारशे कोटींच्यावर खर्च आणि उणेपूरे एका हप्त्याचे अधिवेशन ,त्यात दोन्ही सभागृहात विरोधीपक्ष नेते नाहीत अशातच आता प्रश्नोत्तरे सुद्धा रद्द करण्यात आल्याने विरोधक प्रचंड संतापले आहेत.**



विधी मंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन आज पासुन सुरू झाले आहे, या अधिवेशनावर यावेळी नगर पालिका आचार संहितेचे सावट असल्याने सरकारला कोणतीही घोषणा करता येणार नाही हे लक्षात घेता अधिवेशनाचा कालावधी कमी करण्यात आला त्याचा विरोधी पक्षांनी मोठा विरोध चालवला आहे,घोषणा करता येत नसेल तरीही विदर्भातील प्रश्नांची चारचा करून विकास कामे मार्गी लावण्यात कोणतीही अडचण नव्हती असे असताना सरकार लोकांच्या प्रश्नावर पळ का काढत आहे अशी विचारणा विधानसभा गटनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. विधिमंडळ कामकाज सल्लागार समिती बैठकीत हिवाळी अधिवेशन ८ ते १४डिसेंबर या कालावधीत म्हणजे केवळ एक आठवडा निश्चित करण्यात आले आहे.

आता आठ दिवस चालणाऱ्या अधिवेशनात दररोज सकाळी होणारा प्रश्नोत्तरे हा तास रद्द करण्यात आल्याने तो होणार नसल्याची माहिती असून शेवटच्या दिवशी प्रश्नोत्तराच्या सर्व याद्या टेबल करण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. दरम्यान आज पहिल्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज चालविण्यासाठी आ.चैनसुख संचेती,समीर कुणावार,डॉ.राहुल पाटील,सरोज अहिरे,उत्तम जानकर,किशोर पाटील,राम मसराम,यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.दोन्ही सभागृहात जर प्रश्नोत्तराचा तास होणार नसेल तर जे होईल ते फक्त बघा आणि गप्प बसा अशी वेळ आमच्यावर येणार असल्याचे हतबल उदगार आ.नाना पटोले यांनी काढले. आज सभागृहात सुद्धा पटोले यांनी बोलण्याचा प्रयत्न केला मात्र पटोले याना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बोलू दिले नाही.चारशे कोटींच्यावर खर्च आणि उणेपूरे एका हप्त्याचे अधिवेशन ,त्यात दोन्ही सभागृहात विरोधीपक्ष नेते नाहीत अशातच आता प्रश्नोत्तरे सुद्धा रद्द करण्यात आल्याने विरोधक प्रचंड संतापले आहेत.विधी मंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन आज पासुन सुरू झाले आहे, या अधिवेशनावर यावेळी नगर पालिका आचार संहितेचे सावट असल्याने सरकारला कोणतीही घोषणा करता येणार नाही हे लक्षात घेता अधिवेशनाचा कालावधी कमी करण्यात आला त्याचा विरोधी पक्षांनी मोठा विरोध चालवला आहे.

घोषणा करता येत नसेल तरीही विदर्भातील प्रश्नांची चारचा करून विकास कामे मार्गी लावण्यात कोणतीही अडचण नव्हती असे असताना सरकार लोकांच्या प्रश्नावर पळ का काढत आहे अशी विचारणा विधानसभा गटनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. विधिमंडळ कामकाज सल्लागार समिती बैठकीत हिवाळी अधिवेशन ८ ते १४डिसेंबर या कालावधीत म्हणजे केवळ एक आठवडा निश्चित करण्यात आले आहे आता आठ दिवस चालणाऱ्या अधिवेशनात दररोज सकाळी होणारा प्रश्नोत्तरे हा तास रद्द करण्यात आल्याने तो होणार नसल्याची माहिती असून शेवटच्या दिवशी प्रश्नोत्तराच्या सर्व याद्या टेबल करण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. दरम्यान आज पहिल्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज चालविण्यासाठी आ.चैनसुख संचेती,समीर कुणावार,डॉ.राहुल पाटील,सरोज अहिरे,उत्तम जानकर,किशोर पाटील,राम मसराम,यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

### बघा आणि गप्प बसा

दोन्ही सभागृहात जर प्रश्नोत्तराचा तास होणार नसेल तर जे होईल ते फक्त बघा आणि गप्प बसा अशी वेळ आमच्यावर येणार असल्याचे हतबल उदगार आ.नाना पटोले यांनी काढले. आज सभागृहात सुद्धा पटोले यांनी बोलण्याचा प्रयत्न केला मात्र पटोले याना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बोलू दिले नाही सुद्धा रद्द करण्यात आल्याने विरोधक प्रचंड संतापले आहेत.

## स्मार्ट सिटी प्रकरणात मुंढेंवर गंभीर आरोप

## कृष्णा खोपडे यांना आज सकाळी अज्ञात व्यक्तीकडून धमकीचे कॉल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सततच्या बदल्यांमुळे चर्चेत असणारे राज्याचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या विरोधात भाजप आमदार आज विधीमंडळात लक्षवेधी मांडणार असल्याची चर्चा होती. भाजप आमदार कृष्णा खोपडे हे मुंढे यांच्याविरोधात लक्षवेधी मांडत त्यांच्या निलंबनाची मागणी करणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते.**

यासंदर्भात एका मराठी वृत्तवाहिनीने वृत्तही प्रसिद्ध केले होते. पण या मुद्द्यावरून आमदार खोपडे यांना धमकीचा कॉल आल्याची माहिती आता समोर आली आहे. खोपडे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना या धमकीची माहिती दिली आहे. आम्ही तुकाराम मुंढे यांचे समर्थक आोत. असे सांगून दोघांनी आपल्याला धमकी दिल्याचे खोपडे यांनी सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कृष्णा खोपडे आज विधीमंडळात प्रवेश करत असताना त्यांना धमकीचे कॉल आले. मुंढे यांच्या निलंबनाची मागणी करणार होते. तुकाराम मुंढे यांनी नागपुरात महापालिकेचे आयुक्त असताना त्यांनी बेकायदेशीरपणे स्मार्ट सिटी प्रकल्पाचा प्रभार



नियमबाह्य पद्धतीने आपल्याकडे घेतला होता. तुकाराम मुंढे यांच्याकडे कोणतेही अधिकार नसताना आणि शासनाकडून त्यांची “स्मार्ट सिटी प्रकल्प”चे मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नेमणूक झाली नसतानाही त्यांनी नियमबाह्य पद्धतीने आपल्याकडे प्रभार घेतल्याचा भाजपचा आरोप आहे. त्यामुळे, भाजपने तुकाराम मुंढे यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आमदार कृष्णा खोपडे यांना आज सकाळी अज्ञात व्यक्तीकडून धमकीचे कॉल आल्याचे सांगितले. विधिमंडळात प्रवेश करण्यापूर्वीच हे कॉल आल्याने सुरक्षेबाबत चिंता व्यक्त होत आहे. खोपडे यांनी या संदर्भातील सर्व माहिती विधिमंडळ सचिवालय आणि मुख्यमंत्री कार्यालयाला देण्याची तयारी केली असून, त्यानंतर अधिकृत पोलिस तक्रार दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती मिळते. सध्या या प्रकरणाचा तपास करण्यात येणार असून, धमकीमागील कारणांचा शोध घेतला जात आहे.या दोन्ही प्रकरणांमध्ये त्या काळात पोलिसांकडे एफआयआर दाखल करण्यात आला होता. महाविकास आघाडी सरकारकडून दबाव आल्याने मुंढे यांच्यावर आवश्यक कारवाई होऊ शकली नाही.

### विधीमंडळात लक्षवेधी मांडणार

भाजपचे आमदार आता ही जुनी प्रकरणे पुन्हा उकरून मुंढे यांच्या निलंबनाची मागणी विधिमंडळात मांडणार असल्याची माहिती आहे.सततच्या बदल्यांमुळे चर्चेत असणारे राज्याचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या विरोधात भाजप आमदार आज विधीमंडळात लक्षवेधी मांडणार असल्याची चर्चा होती.

देशात राजकीय वादळ

## सिद्धूंच्या पत्नीच्या वक्तव्यामुळे देशात खळबळ

# '500 कोटी देणारा सीएम बनतो'

## नवज्योत सिंग सिद्धू यांच्या पत्नीवर कारवाई

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू (NAVJOT SINGH SIDHU) यांच्या पत्नी नवज्योत कौर सिद्धू (DR NAVJOT KAUR SIDHU) यांच्यावर काँग्रेस पक्षाने (CONGRESS PARTY) मोठी कारवाई केली आहे. '५०० कोटींचा सूटकेस देणाराच मुख्यमंत्री बनतो,' या त्यांच्या कथित वक्तव्यामुळे काँग्रेसने त्यांना तात्काळ पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वातून निलंबित केले आहे.**



शनिवारी नवज्योत कौर यांनी पंजाबमधील कायदा व सुव्यवस्थेच्या कथित बिघडलेल्या स्थितीसह अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांची भेट घेतली होती. भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले.नवज्योत कौर यांनी पत्रकारांना सांगितले, "आम्ही नेहमी पंजाब आणि पंजाबियतचीच गोष्ट करतो... पण आमच्याकडे मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसण्यासाठी ५०० कोटी रुपये नाहीत." जेव्हा त्यांना कोणी पैसे मागितले आहेत का, असे विचारले गेले, तेव्हा त्या म्हणाल्या, "कोणी मागितले नाहीत, पण जो कोणी ५०० कोटी रुपये देतो, तो मुख्यमंत्री बनतो."या वक्तव्यानंतर मोठा राजकीय वाद निर्माण झाला. कौर यांनी नंतर आपला मुद्दा तोडमोड करून सादर करण्यात आला, असे स्पष्टीकरण दिले. त्या म्हणाल्या, "मी फक्त एवढेच म्हटले की काँग्रेस पक्षाने आमच्याकडे कधीच काही मागितले नाही. नवज्योत दुसऱ्या पक्षातून मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार होऊ शकतात का, असे विचारले असता, मी म्हटले की, आमच्याकडे मुख्यमंत्रीपदासाठी कोणाला देण्यासाठी पैसे नाहीत." मात्र, हे स्पष्टीकरण निष्प्रभ ठरले आणि पक्षाने तातडीने कारवाई केली.नवज्योत कौर यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठे वादळ उठले. भाजप आणि आम आदमी पार्टी (AAP) सह सर्व विरोधी पक्षांनी काँग्रेसवर तीव्र टीका केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, या विधानामुळे काँग्रेसच्या कामकाजाचे 'कठोर सत्य' समोर आले आहे.केंद्रीय मंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी नवज्योत कौर यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. "माझे आजोबा मुख्यमंत्री असताना काँग्रेसमध्ये असे प्रकार

## रवनीत सिंह बिट्टूंचा हल्ला

शनिवारी नवज्योत कौर यांनी पंजाबमधील कायदा व सुव्यवस्थेच्या कथित बिघडलेल्या स्थितीसह अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांची भेट घेतली होती. भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले.नवज्योत कौर यांनी पत्रकारांना सांगितले, "आम्ही नेहमी पंजाब आणि पंजाबियतचीच गोष्ट करतो.

घडत नव्हते, पण आता गेल्या काही वर्षांपासून आम्ही हे सर्व ऐकत आहोत," असे ते म्हणाले. "याच कारणामुळे माझ्यासारख्या लोकांनी पक्ष सोडला," असेही बिट्टू यांनी स्पष्ट केले. बिट्टू यांनी काँग्रेसच्या अंतर्गत कारभारावर टीका करताना म्हटले, "मला वाटत नाही की काँग्रेस पक्ष कधी या प्रकरणाची चौकशी करेल. तेथे एक मुख्यमंत्री म्हणतात की, आम्ही पैशाऐवजी गांधी कुटुंबाला मोजे आणि अंतर्वस्त्रे पाठवतो... तेथून यादी येईल आणि आम्ही सामान पाठवून देऊ."नवज्योत कौर यांच्या विधानावर सत्ताधारी आम आदमी पार्टीने भाष्य केले आहे. आपचे सरचिटणीस बलतेज पन्नू यांनी एक निवदन जारी करत म्हटले की, 'नवज्योत कौर सिद्धू यांनी दोन स्फोटक दावे केले आहेत. पहिला दावा म्हणजे, जर काँग्रेसने त्यांना मुख्यमंत्रीपदाचा चेहरा घोषित केले तरच ते पंजाबच्या राजकारणात सक्रीय होतील. दुसरा दावा म्हणजे सिद्धू यांच्याकडे 500 कोटी रुपये नाहीत. याचा अर्थ असा की काँग्रेसमध्ये मुख्यमंत्री होण्यासाठी 500 कोटी रुपये लागतात.पुढे बोलताना पन्नू यांनी म्हटले की, 'सिद्धू यांच्याकडे 500 कोटी रुपये नाहीत, मग इतके पैसे कोणत्या नेत्याकडे आहेत? हे पैसे कुठे जातात? राज्य युनिट अध्यक्षांकडे? हायकमांडकडे? राहुल गांधी किंवा मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे? पंजाबच्या लोकांना या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत.'

# वंदे मातरमवर संसदेमध्ये चर्चा

## समाजवादी पार्टीचे अखिलेश यादवांचा भाजप अन् RSS वर हल्ला

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सध्या देशाच्या संसदेमध्ये हिवाळी अधिवेशन सुरु झाले आहे. आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये वंदे मातरम या राष्ट्रीय गीतावर चर्चा झाली. संपूर्ण देशाचे लक्ष वंदे मातरम च्या या 10 तास झालेल्या चर्चेकडे लागले होते. वंदे मातरम च्या150 वर्ष पूर्तीवर ही चर्चा आयोजित करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेमध्ये या मुद्द्याला सुरुवात केली.**

समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव यांनी देखील चर्चेमध्ये सहभागी होत भाजपवर निशाणा साधला. लोकसभेत "वंदे मातरम्" या विषयावर चर्चेदरम्यान, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि कन्नौजमधील सपाचे उमेदवार अखिलेश यादव यांनी भाजप आणि आरएसएसचे नाव न घेता त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. सभागृहात भाषणादरम्यान अखिलेश म्हणाले की, स्वातंत्र्यलढ्यादरम्यान संपूर्ण देशाला एकत्र करणारे तेच "वंदे मातरम्" गाणे आता काही "विभाजनकारी" शक्तींकडून देशाचे विभाजन करण्यासाठी राजकीय मुद्दा बनवला जात आहे.अखिलेश यादव हे उपहासात्मकपणे म्हणाले की, आज जेव्हा आपण त्यांची भाषणे



ऐकतो तेव्हा असे वाटते की जणू त्यांनी वंदे मातरम् लिहिले आहे. आज इतिहास तपासण्याची गरज आहे.काही माहिती देणाऱ्यांना प्रश्न विचारला पाहिजे. स्वातंत्र्यानंतर त्यांनी स्वतःचे गाणे का रचले? त्यांनी तिरंगा का फडकावला नाही? स्वातंत्र्यलढ्यादरम्यान हे लोक कुठे होते? अखिलेश यांनी अप्रत्यक्षपणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर हल्ला चढवला आहे. लोकसभेत भाषणादरम्यान, सपा प्रमुख अखिलेश यादव यांनी अयोध्येचे खासदार अवधेश

## वंदे मातरम आपल्याला ऊर्जा देते

ते अजूनही आपल्याला ऊर्जा देते. परंतु काही लोक ते विकृत करण्याचा प्रयत्न करत आहेत."कनौजचे खासदार अखिलेश यादव यांच्या भाषणादरम्यान, समाजवादी पक्षाच्या खासदारांनी समर्थनार्थ आपले बाक वाजवली, तर सत्ताधारी पक्षाच्या काही सदस्यांनी निषेध केला. काही सदस्यांनी वंदे मातरमला राष्ट्रगीत म्हणून अधिक आदर देण्याची मागणी केल्यावर सभागृहात वादविवाद सुरू झाला.

प्रसाद यांचा हात वर करत म्हटले की, "उत्तर प्रदेशने सांप्रदायिक राजकारणाचा पराभव केला आहे." समाजवादी पक्षाच्या खासदारांनी एकाच वेळी पीडीए (मागास, दलित, अल्पसंख्याक) घोषणा दिल्या.अखिलेश पुढे म्हणाले, "त्यांचा इतिहास पहा. त्यांनी निवडणूक सभांमध्ये कधीही बाबासाहेब भीमराव आंबेडकरांचे फोटो लावले नाहीत. पण जेव्हा बसपा-सपा युतीने त्यांना पराभूत केले तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचे फोटो लावण्यास सुरुवात केली." अशी टीका अप्रत्यक्षपणे मायावती आणि भाजप दोघांनाही उद्देशून करण्यात आली."हे दिखावा किंवा राजकारणाबद्दल नाही. या गाण्याने ब्रिटिशांना हाकलून लावण्यास मदत केली.

# या बॉलिवुड कलाकाराला तुम्ही ओळखलं का ?

चित्रपटात केवळ नायक आणि नायिका असणे महत्त्वाचे नाही तर खलनायक असणे देखील महत्त्वाचे आहे, जे स्टोरी मनोरंजक आणि शक्तिशाली बनवण्यासाठी महत्त्वाचे आहे. हिंदी चित्रपटसृष्टीत, प्रत्येक खलनायकाने त्याचे पात्र इतके साकारले आहे की लोक त्याचा द्वेष करू लागले, परंतु वास्तविक जीवनात तो पूर्णपणे वेगळा आहे. आज आपण अशाच एका महान अभिनेत्याबद्दल बोलत आहोत, ज्याने त्याच्या चित्रपट कारकिर्दीत सर्वाधिक नकारात्मक भूमिका साकारल्या. यानंतर, तो अनेकदा त्याच प्रकारे दिसला, परंतु जेव्हा लोक त्याच्या वास्तविक जीवनात समोरासमोर आले तेव्हा त्यांना कळले की तो कसा माणूस आहे. आपण बॉलीवूड चित्रपटांमधील प्रसिद्ध खलनायक प्रदीप काबरा बद्दल बोलत आहोत, जो रात्रंदिवस आपल्या आईची सेवा करण्यात व्यस्त आहे.प्रदीप काबरा हा चित्रपटांमध्ये नकारात्मक भूमिका साकारण्यासाठी ओळखला जाणारा अभिनेता आहे. विशेष म्हणजे त्याने अनेक बॉलिवूड चित्रपटांमध्ये खलनायकाची भूमिका साकारली आहे, परंतु सलमान खानच्या "वॉन्टेड" चित्रपटात नकारात्मक भूमिका साकारल्यानंतर त्याला ओळख मिळाली. प्रदीपने "वॉन्टेड", "बँग बँग", "दिलवाले", "सूर्यवंशी" आणि "सिम्बा" सारख्या चित्रपटांमध्ये खलनायक आणि गुंडांची भूमिका साकारली आहे, परंतु वास्तविक जीवनात तो पूर्णपणे वेगळा आहे. तो कधीही कोणाशीही खेळत नाही आणि त्याच्या कुटुंबावर लक्ष केंद्रित करतो. सोशल मीडियावर अनेक दिवसांपासून व्हायरल होत असलेला त्याचा एक व्हिडिओ हा पुरावा आहे.

# ७२ तास जागून 'धुरंधर'चा टीझर केला तयार

रणवीर सिंग, संजय दत्त, अक्षय खन्ना, आर. माधवन आणि अर्जुन रामपाल यांसारख्या कलाकारांच्या अभिनयाने भरलेला "धुरंधर" हा चित्रपट सध्या खूप कौतुकास्पद ठरत आहे. ५ डिसेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झालेला हा चित्रपट अपवादात्मकरित्या चांगला कामगिरी करत आहे. चित्रपटाच्या प्रभावी कमाईत, ओजस गौतमचे नाव अचानक चर्चेत आले आहे. तोच ओजस आहे ज्याने चित्रपटाचा ट्रेलर आणि टीझर संपादित केला होता.धुरंधर" चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला तेव्हा त्याला प्रेक्षकांकडून खूप प्रतिसाद मिळाला. कंटेंटसोबतच त्याच्या एडिटिंगचेही कौतुक झाले. हा चित्रपट इंडस्ट्रीतील सर्वोत्तम ट्रेलर कटपैकी एक मानला गेला. ही प्रशंसा चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य धर यांचे मेहुणे, २२ वर्षीय ओजस याने खरोखरच करायला हवी. ओजस गौतम हा अभिनेत्री यामी गौतमचा भाऊ आहे. चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला तेव्हा ओजसचा मेहुणा आदित्य धर यांनी त्याची प्रेक्षकांशी ओळख करून दिली. आदित्य म्हणाला, "तुम्हा सर्वांना ट्रेलर आणि टीझर खूप आवडला. मी यात एक नाव जोडू इच्छितो. मी तुम्हाला सर्वांना सांगू इच्छितो की चित्रपटाचा ट्रेलर आणि टीझर माझ्या २२ वर्षांच्या डीएने कापला होता." त्याने ओजसला स्टेजवर बोलावले आणि सांगितले की तो तिथे येण्यास पात्र आहे. जेव्हा ओजस येण्यास कचरत होता, तेव्हा चित्रपटाचा मुख्य अभिनेता रणवीर सिंग स्वतः गेला आणि ओजसला घेऊन आला.

# नयनताराने सोडलं मौन



नयनताराचे नाव दक्षिण चित्रपटसृष्टीतील सुंदर आणि लोकप्रिय अभिनेत्रींच्या यादीत समाविष्ट आहे. तिला या इंडस्ट्रीमध्ये एक सुपरस्टार म्हणून ओळखले जाते. नयनतारा केवळ तिच्या चित्रपटांमुळेच नाही तर तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर अशी अफवा पसरली आहे की, नयनतारा आणि तिचा पती विघ्नेश शिवन यांच्यात सर्व काही ठीक नाही आणि दोघेही घटस्फोट घेणार आहेत. या चर्चांवर तिने स्वतः मौन सोडले आणि अफवा पसरवणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर दिले.खरं तर, काही दिवसांपासून सोशल मीडियावर एक बनावट स्क्रीनशॉट व्हायरल होत आहे, ज्यामध्ये नयनताराने तिच्या लग्नाला मोठी चूक म्हटले आहे. यानंतर तिच्या लग्नात समस्या निर्माण झाल्याच्या बातम्या पसरू लागल्या आणि अभिनेत्री तिचा पती विघ्नेशला घटस्फोट देणार आहे, ही बातमी ऐकल्यानंतर तिचे चाहतेही खूप काळजीत पडले होते. आता नयनताराने या अफवांना उत्तर म्हणून एक पोस्ट शेअर केली आहे.नयनताराने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटच्या स्टोरीवर ही पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये ती पती विघ्नेशबरोबर दिसली आणि दोघेही आश्चर्यकारक प्रतिक्रिया देताना दिसले. हे शेअर करताना अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, "आमची प्रतिक्रिया... जेव्हा आपण स्वतःबद्दल विचित्र बातम्या पाहतो.." नयनताराने तिच्या स्वतःच्या स्टाईलमध्ये तिच्या लग्नाबद्दल ही खोटी बातमी पसरवणाऱ्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.अभिनेत्री नयनताराने २०२२ मध्ये विघ्नेश शिवनशी लग्न केले. लग्नानंतर हे जोडपे जुळ्या मुलांचे पालक बनले. कामाबरोबरच दोघेही सोशल मीडियावरही खूप सक्रिय असतात.

# अस्लम चौधरीची पत्नी कोर्टात

आदित्य धर यांचा "धुरंधर" हा चित्रपट, जो वास्तविक जीवनातील घटनांवर आधारित आहे, तो पाकिस्तानमधील दहशतवादाविरुद्ध, विशेषतः कराचीच्या लियारी टोळ्यांविरुद्ध भारताच्या लढाईचे अर्ध-काल्पनिक वर्णन आहे. चित्रपटातील अनेक पात्रे वास्तविक लोकांवर आधारित आहेत. या सिनेमात रणवीरने मेजर मोहित शर्मा या पाकिस्तानात भारतीय गुप्तहेर बनून राहिलेल्या भारतीय लष्कर अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे. तर सिनेमात अभिनेता संजय दत्त पाकिस्तानी पोलीस अधिकारी चौधरी अस्लम खानच्या भूमिकेत आहे. पण धुरंधर सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. चौधरी अस्लम खानची पत्नी नोरीन यांनी रणवीरच्या सिनेमातील काही डायलॉगवर नाराजी व्यक्त करत कायदेशीर कारवाई करणार असल्याचं म्हटलं आहे.डायलॉग पाकिस्तानच्या पॉडकास्टवर बोलताना नूरीन या म्हणाल्या की, "१९९० च्या दशकात खलनायक पाहिल्यापासून त्यांचे पती संजय दत्तचा फॅन होते आणि त्यांना विश्वास होता की अभिनेता त्याच्या व्यक्तिमत्त्वाला न्याय देईल. पण त्यांना एक तक्रार होती. संजय दत्त माझ्या पतीच्या भूमिकेला पुरेपूर न्याय देतील याची मला खात्री आहे". 'धुरंधर' सिनेमात संजय दत्तने साकारलेल्या एसपी चौधरी अस्लम खान यांच्या व्यक्तिरेखेची ओळख करून देताना सैतान आणि जीन यांची संतती असे शब्द वापरण्यात आले आहेत."धुरंधरमधील या वाक्यावर चौधरी अस्लम खानची पत्नी नोरीन यांनी आक्षेप घेतला आहे,"आम्ही मुस्लिम आहोत आणि असे शब्द केवळ असलमचाच नाही तर त्याच्या आईचाही अपमान करतात, जी एक साधी, प्रामाणिक महिला होती. जर मला असे वाटत असेल की चित्रपटात माझ्या पतीला नकारात्मक पद्धतीने दाखवण्यात आले आहे किंवा त्याच्याविरुद्ध कोणताही प्रचार करण्यात आला आहे, तर मी निश्चितपणे सर्व कायदेशीर कारवाई करेन. भारतीय चित्रपट निर्मात्यांना पाकिस्तानची बदनामी करण्याशिवाय दुसरा कोणताही विषय सापडत नाही हे विचित्र आहे."

# FARRHANA BHATTला लागली लॉटरी



'बिग बॉस १९' हा लोकप्रिय शो अखेर संपला आहे. या शोने अखेर प्रेक्षकांचा निरोप घेतला आहे. गौरव खन्नाने या सीझन गाजवला असून, ट्रॉफी आपल्या नावावर केली आहे. आणि आता सर्वांच्या नजरा खतरों के खिलाडी या रिॲलिटी शोवर आहेत, जो बिग बॉस नंतर प्रीमियर होईल. रोहित शेट्टी लवकरच खतरों के खिलाडीच्या १५ व्या सीझनसह परतणार आहे. त्याने बिग बॉसमध्ये त्याच्या उपस्थितीदरम्यान त्याच्या रिॲलिटी शोची घोषणा केली आणि आता निर्माते हळूहळू शोसाठी स्पर्धकांशी संपर्क साधत आहेत. खतरों के खिलाडीसाठी बिग बॉस स्पर्धकांशी संपर्क साधला जातो आणि आता निर्मात्यांची नजर फरहाना भट्टवर आहे. निर्माते फरहाना भट्टला शोमध्ये आणण्याचा प्रयत्न करत आहेत.बिग बॉस १९ मध्ये असताना, फरहाना भट्टने तिच्या फ्यूचर प्लान बदल सांगितले. बिग बॉस नंतर तिने खतरों के खिलाडी १५ मध्ये येण्याबद्दल बोलले होते, ज्यामुळे चाहत्यांना असे संकेत मिळाले होते की ती पुढे खतरों के खिलाडी मध्ये दिसणार आहे. आता, बिग बॉस १९ संपल्यानंतर, फरहाना भट्टने इंडिया फोरम्सशी एका खास मुलाखतीत संवाद साधला. या दरम्यान तिने खतरों के खिलाडी बद्दल उघडपणे सांगितले. तिने सांगितले की तिला पुढील रिॲलिटी शो, खतरों के खिलाडी १५ मध्ये काम करायचे आहे. फरहाना भट्टने मुलाखतीत असेही सांगितले की तिला रोहित शेट्टीच्या शोकडून ऑफर मिळाली आहे आणि तिला त्याचा भाग व्हायला आवडेल. खतरों के खिलाडी हा तिच्या रिॲलिटी शोच्या प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग असेल.फरहाना भट्ट बिग बॉस १९ ची पहिली रनर-अप होती. तिला शोमध्ये चाहत्यांचा मोठा पाठिंबा मिळाला. तिचे नाव बराच काळ ट्रेंडिंगमध्ये राहिले आणि अनेक सेलिब्रिटींनीही त्यांचा पाठिंबा व्यक्त केला. फरहानाला पाठिंबा देणाऱ्यांमध्ये दीपिका कक्कर, रिद्धी डोगरा, कुनिका सदानंद आणि माहिरा खान यांचा समावेश आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की फरहाना भट्ट चित्रपटांमधून आली होती, टेलिव्हिजनमधून नाही. तिने रोहित शेट्टीच्या सिंघम अगेन चित्रपटात काम केले होते.

'बिग बॉस १९' हा लोकप्रिय शो अखेर संपला आहे. या शोने अखेर प्रेक्षकांचा निरोप घेतला आहे. गौरव खन्नाने या सीझन गाजवला असून, ट्रॉफी आपल्या नावावर केली आहे. आणि आता सर्वांच्या नजरा खतरों के खिलाडी या रिॲलिटी शोवर आहेत, जो बिग बॉस नंतर प्रीमियर होईल. रोहित शेट्टी लवकरच खतरों के खिलाडीच्या १५ व्या सीझनसह परतणार आहे.

एक्झर्बिया ॲबोड युवा कराटे ट्रेनिंग सेंटर

टीम एसव्हीपीच्या खेळाडूंची दणदणीत कामगिरी

# राष्ट्रीय कराटे अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात!

## सुवर्ण, रौप्य, कांस्य पदकांची लयलूट

। दौंड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कराटे क्रीडेला चालना देण्यासाठी दौंड शहरात भरविण्यात आलेली राष्ट्रीय कराटे अजिंक्यपद स्पर्धा उत्साह व जल्लोषात पार पडली. मार्शल आर्ट बॉक्सिंग कराटे ट्रेनिंग स्कूलच्या वतीने ३० नोव्हेंबर रोजी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. एक्सर्बिया ॲबोड, जांभूळगाव येथील युवा कराटे ट्रेनिंग सेंटर तसेच समाज विकास प्रतिष्ठानच्या बालकलाकारांनी या स्पर्धेत चमकदार कामगिरी करीत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची लयलूट केली.**



स्पर्धेचे उद्घाटन पुणे जिल्हा शिक्षण मंडळ अधिकारी व शालेय क्रीडा, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष शाम भोसले यांच्या हस्ते झाले. कराटे मार्गदर्शक राजेंद्र साळवे, ओम नर्सरी स्कूलचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर गोडेवाल व लक्ष्मी गोडेवाल मान्यवर म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेत महाराष्ट्रासह एकूण आठ राज्यांतील ५०० हून अधिक कराटेपटूंनी सहभाग नोंदवला. विविध वयोगटातील खेळाडूंनी उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, शिस्तबद्धता, वेग, एकाग्रता आणि स्पोर्ट्समॅनशिपचे दर्शन घडवत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. प्रत्येक सामन्यानंतर विजेत्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांनी गौरविण्यात आले. यावेळी कराटे क्षेत्रात कार्यरत राहून समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सागर शिंदे, राजेश कलवनूर, गोविंद शिंदे, बाबू गरड आणि गिरिजा भालेराव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात विशाल तरस, राहुल पवार, राजू जाधव, सपना गुजर, संजय राते यांनी मोलाचे योगदान दिले. तांत्रिक समितीचे अधिकारी झहीर अन्सारी यांच्या टीमने सर्व सामने योग्य पद्धतीने पार पाडले. तसेच हिरालाल साळवे यांनीही विशेष सहकार्य केले. राष्ट्रीय स्तरावरील ही स्पर्धा दौंडमध्ये पार पडल्याने शहराचे क्रीडा मानांकन अधिक उंचावले असून स्थानिक खेळाडूंना राष्ट्रीय दर्जावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. युवा कराटे ट्रेनिंग सेंटरचे अध्यक्ष शाम राजाराम भोसले, सचिव विशाल तरस, प्रशिक्षक योगेश खंडागळे तसेच मुख्य प्रशिक्षक सुशांत ओव्हाळ व निशांत ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे यश संपादन केले.

### एक्झर्बिया ॲबोड जांभूळगाव युवा कराटे ट्रेनिंग सेंटरचे विजेते...

**सुवर्णपदक :** गार्गी रोशन पवार, वीणा विजय भोरे, अनुष्का हर्षल सिरसुलवर, विहान विजय भोरे

**रौप्यपदक :** भाविका नीलेश परदेशी

**कांस्यपदक :** वेदिका विकास भोईटे, तुषार दीपक पाटील, प्रणित प्रकाश कांबळे

# अभिषेकसोबत सलामीला कोण?

## दक्षिण आफ्रिकेविरुद्ध चालणार अभिषेक शर्माची जादू!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ५ टी २० सामन्यांची मालिका ९ डिसेंबरपासून खेळली जाणार आहे. कटकमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पहिला टी२० सामन्या खेळला जाणार आहे. या सामन्यापूर्वी, टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदे घेतली आणि यामध्ये अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. मुख्य चर्चा सलामीवीर कोणाला संधी द्यायची यावर बेतलेली होती. संजू सॅमसन की शुभमन गिल या पैकी कोण अभिषेक शर्मासोबत सलामीला उतरणार आहे? यावर सूर्याने त्या खेळाडूचे नाव सांगितले आहे.**




२०२६ च्या टी२० विश्वचषकाच्या तयारीसाठी, भारतीय संघाने या मालिकेसाठी आपल्या संघाच्या संघावर लक्ष केंद्रित केले आहे. सूर्यकुमार म्हणाला की संघात जास्त बदल करायचे नाहीत. केवळ खेळण्याच्या शैली आणि सामन्याच्या रणनीतीवर लक्ष केंद्रित करणार अहोत. तो सूर्या म्हणाला की, "आम्ही संघात जास्त बदल करणार नाही. आमचे लक्ष केवळ आम्हाला कोणत्या प्रकारचे क्रिकेट खेळायचे आहे यावर आहे."संजू सॅमसन आणि शुभमन गिल यांच्यापैकी कोण सलामीला येईल असा प्रश्न विचरला असता कर्णधाराने सांगितले की दोन्ही खेळाडूंना संघात स्थान आहे आणि ते लवचिक आहेत. संजू सॅमसनबाबत बोलताना तो म्हणाला की, "संजू हा एक फलंदाज आहे जो वरच्या क्रमाने खेळण्याची शक्यता आहे. त्याने सलामीवीर म्हणून चांगली कामगिरी केली असून शुभमन संजूच्या आधी खेळला कारण तो त्या स्थानासाठी पात्र होता, परंतु आम्ही खात्री केली आहे की, संजूलाही संधी मिळणार." या विधानावरून स्पष्ट होते की कर्णधाराला दोन्ही खेळाडूंवर विश्वास असून तो संघात संतुलन ठेवण्याची इच्छा ठेवतो.फलंदाजी क्रमाबद्दलच्या प्रश्नांबाबत उत्तर देताना सूर्या म्हणाला की सलामीवीरांव्यतिरिक्त इतर खेळाडूंना लवचिक राहून परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागणार आहे. तो म्हणाला की, "हे दोघे (गिल आणि संजू) आमच्या योजनेचा भाग असून ते अनेक भूमिका निभावू शकतात. हे संघासाठी एक संपत्ती आहे." कर्णधाराने असे देखील म्हटले की, टी-२० विश्वचषकापूर्वी संघाचे दोन मजबूत संघांविरुद्ध १० टी-२० सामने होणार आहेत. म्हणूनच, सध्या त्या सामन्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे आणि स्पर्धा जवळ येत असताना, संघ हळूहळू आपले लक्ष विश्वचषकाकडे वळवेल.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ९ डिसेंबरपासून ५ सामन्यांच्या टी २० मालिकेला सुरुवार होणार आहे. या मालिकेत भारतीय संघाचा स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा टी२० स्वरूपात इतिहास रचू शकतो. २०२५ हे वर्ष त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम वर्षांपैकी ठरले आहे. जिथे त्याने या स्वरूपात खोऱ्याने धावा काढल्या आहेत. त्याची आक्रमक फलंदाजी भारतीय संघासाठी एक मोठी बळकटी प्राप्त करून देतात. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेत अभिषेक शर्मावर सर्वांच्या नजरा असणार आहेत.सध्या, २०२५ मध्ये टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पूर्ण सदस्य संघांमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत झिम्बाब्वेचा ब्रायन बेनेट पहिल्या स्थानावर विराजमान आहे. या वर्षी त्याने २५ डावांमध्ये ९३६ धावा फटकावल्या आहेत. अभिषेक शर्मा या यादीत चौथ्या स्थानी असून त्याने २०२५ मध्ये आतापर्यंत १७ टी-२० सामन्यांमध्ये ७५६ धावा काढल्या आहेत.

### इतर फलंदाजांची कामगिरी

जर त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत आणखी १८१ धावा जोडल्या तर तो या वर्षी टी-२० सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बणी शकतो.२०२५ मध्ये टी-२० सामन्यांमध्ये धावा करणाऱ्यांच्या बाबतीत बांगलादेशचा तन्झिद हसन दुसऱ्या स्थानी आहे. त्याने आतापर्यंत २७ सामन्यांमध्ये ७७५ धावा काढल्या आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार।
। दि. 9 डिसेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भोसरी येथे राष्ट्रीय अबॅकस आणि वैदिक गणित

# स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद!

### शिक्षण विश्व : मास्टर माइंड ग्लोबल स्कूल तर्फे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी येथील मास्टर माइंड ग्लोबल स्कूलमध्ये राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस आणि वैदिक गणित स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. गुजरात सुरत दहाणू मुंबई पनवेल सातारा सांगली मिरज सोलापूर लातूर आणि पुणे अशा विविध राज्य व शहरांमधून सहाशेहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या गणिती कौशल्याची प्रभावी झलक दाखवली.**




स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख अतिथी अंकलॉजिस्ट करण चंचलानी , आपला आवाज आपली सखी संस्थेच्या संचालिका संगीता तरडे, क्रिएटिव्ह कॅलिबर माईंडच्या संचालिका कांचन मुछाल आणि विद्यालयाच्या प्राचार्या डॉ प्रदीपा नायर यांच्या हस्ते संपन्न झाले. अतिथींनी विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या वेगवान आणि अचूक गणनक्षमतेचे कौतुक करत अशा स्पर्धा मुलांच्या बौद्धिक विकासाला अत्यंत पूरक असल्याचे मत व्यक्त केले.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी काही सेकंदांत गुंतागुंतीची उदाहरणे सोडवून परीक्षकांना प्रभावित केले. विविध गटांसाठी स्वतंत्र प्रश्नसंच तयार करून विद्यार्थ्यांच्या वेग अचूकता आणि मानसिक गणनेची क्षमता तपासण्यात आली.

समारोप प्रसंगी विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्रे आणि ट्रॉफीद्वारे गौरव करण्यात आला. शाळेच्या व्यवस्थापनाने या कार्यक्रमाच्या यशात योगदान देणाऱ्या सर्व शिक्षक पालक आणि मान्यवरांचे आभार मानले.

## आपल्या आवडत्या क्षेत्रात उच्च स्थानावर जा: यजुर्वेंद्र महाजन

### शिक्षण विश्व: चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसमध्ये प्रतिभा सृजन व्याख्यानमालेचे आयोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : क्षेत्र कोणतेही निवडा मात्र त्या क्षेत्रामध्ये उच्च स्थानावर जा. थोडक्यात त्या क्षेत्रातील सर्व बारकावे समजून घ्या. असे मत दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक यजुर्वेंद्र महाजन यांनी चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या वतीने आयोजित प्रतिभा सृजन व्याख्यानमालेत काढले.**




प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले . "याला जीवन ऐसे नाव" या विषयावरील प्रथम पुष्प गुंफताना महाजन आपल्या व्याख्यानात बोलत होते .यावेळी संस्थेच्या अध्यक्षा प्रतिभा शहा ,संस्थापक डॉ दीपक शहा , खजिनदार डॉ भूपाली शहा, संचालिका डॉ तेजल शहा, प्राचार्या डॉ क्षितिजा गांधी ,डॉ वनिता कुऱ्हाडे, डॉ पौर्णिमा कदम, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरिया ,एम बी ए चे संचालक डॉ सचिन बोरगावे, मुख्याध्यापिका डॉ वृंदा जोशी , नाना शिवले , प्रतिभा स्कूल सोमाटणे फाटा च्या मुख्याध्यापिका प्रा सुनिता फडके समवेत प्राध्यापक , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी ,पालक ,विद्यार्थी मोठ्या संख्येने व्याख्यानासाठी उपस्थित होते.

महाजन पुढे म्हणाले,ईश्वराने सर्व काही करण्याची प्रत्येकात ताकद दिली आहे ,तुम्ही स्वतःला काय समजता, आपल्या आवडत्या क्षेत्रात किती मेहनत घेता .त्यावर सर्व काही अवलंबून असते. प्राण्यांची बुद्धी कमी असते त्यांना खानपान समजते. ज्यांची कृती, विचार चांगला आहे .जो प्रामाणिक आहे .खोटे बोलत नाही. निस्वार्थ भावनेतून सेवाभाव करतो. स्वतःच्या फायद्यासाठी इतरांचे नुकसान करत नाही. जो स्वार्थी नसतो तो चांगला माणूस असतो. पण खोटं काम करून फसवणूक करणारा द्रवरुपी अथवा समाजात , प्रतिष्ठा असणारा मग तो कितीही मोठा असला , तरी तो चांगला माणूस नसतो. तुम्हाला आपले जीवन कशासाठी आहे हे उमजले पाहिजे. इतरांसाठी निरपेक्ष भावनेने जे जे मदत करतात, या जगतात माझ्या मते तेच खरे जिवंत असतात .तुम्ही तुमच्या भावी आयुष्यात हजारो लाखोच्या मनावर प्रभाव पाडण्याचे ध्येय व स्वप्न पहावे व महान माणूस आपल्या आवडत्या क्षेत्रात बनावे, असे आवाहन चे

अध्यक्षीय भाषणात डॉ दीपक शहा म्हणाले ,मोबाईलमुळे आजकाल विद्यार्थ्यांमध्ये वाचण्याचा व ऐकण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यांना आयुष्यात वेळीच दिशा मिळावी. विविध क्षेत्रातील तज्ञ व्याख्यात्यांचे व्याख्यान ऐकण्याची संधी उपलब्ध व्हावी , यासाठी संस्थेच्या 19 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून प्रतिभा सृजन व्याख्यानमालेचे आयोजन यावर्षी करण्यात आले. यापुढे दरवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

## भाजपाच्या निशा यादव यांचा संकल्प

# प्रभागातील प्रश्न सोडवण्यासाठी सर्वोतोपरी कटिबद्ध!

## कुदळवाडी येथे भैरवनाथ महाराजांच्या साक्षीने दिनदर्शिकाचे उत्साहात लोकार्पण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिखली गावचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांच्या साक्षीने प्रभाग क्रमांक ११ च्या इच्छुक उमेदवार सौ. निशा (निशाताई) दिनेश यादव यांच्या दिनदर्शिकेचे लोकार्पण सोहळा आज उत्साहात पार पडला. इंद्रायणी महिला प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी आयोजन केलेल्या या कार्यक्रमात स्थानिक महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. कुदळवाडी परिसरातील ग्रामस्थांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला..**






कार्यक्रमाची सुरुवात श्री भैरवनाथ महाराजांच्या पूजनाने झाली. त्यानंतर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आणि पदाधिकाऱ्यांनी निशाताई यादव यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेत त्यांचे स्वागत केले. दिनदर्शिकेमध्ये प्रभागातील उपयुक्त माहिती, सामाजिक उपक्रमांचे दर्शन आणि स्थानिक प्रश्नांवर प्रकाश टाकणारी माहिती समाविष्ट असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

सौ. निशाताई यादव या भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या सौभाग्यवती असून, भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रमांत त्या सक्रिय आहेत. महिलांच्या सबलीकरणासाठी, प्रभागातील स्वच्छता मोहिमा, स्थानिक विकासकामे आणि नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केल्याचे ग्रामस्थांनी यावेळी नमूद केले.

> “प्रभाग क्रमांक ११ मधील प्रत्येक नागरिकाचा प्रश्न हा माझा स्वतःचा प्रश्न आहे. विकासकामे, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, पायाभूत सुविधा आणि तरुणांसाठी संधी— या सर्व गोष्टींना प्राधान्य देत प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. आपल्या विश्वासाची आणि सहकार्याची साथ मिळाली, तर आपल्या प्रभागाला आदर्श प्रभाग बनवणे हे स्वप्न निश्चितपणे साकार होईल.
> **- निशा यादव, अध्यक्षा, इंद्रायणी महिला प्रतिष्ठान.**

लोकार्पण सोहळ्यानंतर निशाताई यादव यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला. “प्रभाग क्रमांक ११ मधील नागरिकांचे प्रश्न, सुविधा आणि विकासकामे यांना प्राधान्य देणार आहोत. सर्वांनी साथ दिल्यास आपला प्रभाग आदर्श बनविण्यात आम्ही नक्की यशस्वी होऊ,” असेही त्या म्हणाल्या.

---


## सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू गजाआड

# आठ दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी; मुंढवा जमीन घोटाळा प्रकरण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंढवा येथील ४० हेक्टर जागेच्या खरेदी-विक्री घोटाळा प्रकरणात दस्त नोंदणी करणाऱ्या सह दुय्यम निबंधकाला बावधन पोलिसांनी रविवारी (दि . ७) अटक केल्यानंतर सोमवारी (दि. ८) पौड न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १५ डिसेंबरपयंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.**

रवींद्र बाळकृष्ण तारू (वय ५८, रा. भोर) असे पोलीस कोठडी सुनावलेल्या सह दुय्यम निबंधकाचे नाव आहे. याप्रकरणी सह जिल्हा निबंधक वर्ग १ अधिकारी संतोष अशोक हिंगाणे यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणात जमीन विक्रीबाबत कुलमुखत्यार पत्र असलेली महिला शीतल किशनचंद तेजवाणी ही सध्या पुणे शहर पोलीसांच्या कोठडीत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांची भागीदारी असलेल्या अमेडिया इंटरप्रायजेस एलएलपी कंपनीचे भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील यांच्यासह जमीन विक्रीबाबत कुलमुखत्यार पत्र असलेली महिला शीतल तेजवाणी




आणि दस्त नोंदणी करणारे सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू या तिघांविरुद्ध बावधन पोलिस ठाण्यात ६ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणात शितल तेजवानी हिला पुणे पोलिसांनी अटक केली असून ती सध्या पोलीस कोठडीत आहे. बावधन पोलीसांनी रविवारी याप्रकरणातील आरोपी सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू याला भोर येथील राहत्या घरातून अटक केली. सोमवारी तारू याला पौड न्यायालयात हजर करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांनी आरोपी तारू याला दहा दिवस पोलीस कोठडी देण्याची मागणी केली. इतर आरोपींनी जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर भोगवटदाराचे नाव ‘मुंबई सरकार’ असल्याचे माहिती असतानाही व आवश्यक शासन परवानगी न घेता व्यवहार केला. आरोपींनी संगनमत करून शासनाला देय असलेले सुमारे ६ कोटी रुपये मुद्रांक शुल्क न भरता फसवणूक केली. आरोपींनी दस्त नोंदणी करताना सादर केलेला सातबारा बंद असताना तसेच शितल तेजवानी हिच्याकडे मालकी हक्काबाबत कोणतीही खात्री न करता तारू यांनी दस्त नोंदणी केली. मुंबई सरकार या नोंदीकडे दुर्लक्ष करुन महसुल विभागाकडील ‘आय सरीता’ या ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये स्किप हा पर्याय वापरुन तारू याने दस्त कोणाच्या सांगण्यावरुन नोंदवला आणि या प्रणाली द्वारे कसा नोंदवला त्याबाबत तपास करायचा आहे.

दस्त नोंदणी करताना भरायच्या मुद्रांक शुल्कामधुन सवलत मिळण्याकरीता जिल्हा उदयोग केंद्र कार्यालयाचे पात्रता प्रमाणपत्र घेणे अनिवार्य असताना व प्रमाणपत्रा बाबत कोणत्याही प्रकारची खातरजमा न करता तारू याने गुन्हयातील इतर आरोपी यांना फायदा होण्याच्या उददेशाने जाणीवपुर्वक महसुल बुडवुन दस्त नोंदणी केली आहे.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046